| Education Office<br>Zilla Parishad (Secondary)<br>Chelipura Highschool,<br>Station Road,<br>Chhatrapati Sambhaji Nagar-431001 | महाराष्ट्र शासन | शिक्षणाधिकारी कार्यालय<br>जिल्हा परिषद<br>(माध्यमिक विभाग)<br>चेलीपुरा हायस्कुल, स्टेशन रोड,<br>छत्रपती संभाजीनगर-४३१००१ | |
|---|---|---|---|

दुरध्वनी : (0240) 2348564 e-mail: rmsaaurangabad@gmail.com


जा.क्र.जिपछसं/शि/मावि-६/२०२३-२४/ 9128 दिनांक:- 06/12/2024

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
अनुदानित/अशंत: अनुदानित/विनाअनुदानित/
कायमविनाअनुदानित/स्वयं अर्थसहाय्यित/
जिल्हा परिषद प्रशाला/ महानगरपालिका शाळा
अंतर्गत जिल्हा छत्रपती संभाजीनगर

**विषय : सन 2024-25 च्या संच मान्यतेकरिता दिनांक 1.10.2024 रोजी कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची संख्यात्मक माहिती स्कूल पोर्टलवरील संच मान्यतेत भरणेबाबत...**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2024-25 च्या संच मान्यता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही एनआयसी पुणे यांचे स्तरावरुन सुरु आहे. आपल्या शाळेची सन 2024-25 ची संचमान्यता निर्गमित होण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

सन 2024-25 च्या संच मान्यतेसाठी दिनांक 1.10.2024 रोजी कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्यात्मक माहिती https://education.maharashtra.gov.in/ संच मान्यता टॅब वर लॉगिन करून Working Post या मेनूमध्ये Working Staff Teaching क्लिक करून योग्य अनुदान प्रकारानुसार कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षक संवर्गातील पदाची माहिती नोंद करून Update व Finalize करावी. त्यानंतरच Working Staff Non Teaching ची नोंद पूर्ण करावी.

सरदची कार्यवाही दिनांक 10 डिसेंबर, 2024 पर्यंत करणे आवश्यक आहे. ऑनलाईन प्रणालीत कार्यरत मान्यताप्राप्त कर्मचा-यांची माहिती नोंद न केल्यास आपल्या शाळेची संच मान्यता जनरेट होणार नाहीत.

सन 2024-25 ची संच मान्यता उपलब्ध न झाल्यास त्याची स्वर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील याची नोंद घ्यावी.

शाळेच्या पार्सवर्डबाबत समस्या असल्यास संबंधित केंद्र प्रमुखांकडून पासवर्ड रिसेट करुन घ्यावा.

(अश्विनी लाठकर)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

प्रत : 1) मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविन सादर

2) मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, संभाजीनगर यांना समादराने अग्रेषित.
4) शिक्षणाधिकारी (महानगरपालिका) छत्रपती संभाजीनगर ) यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
5) गटशिक्षणाधिकारी,छत्रपती संभाजीनगर/गंगापुर/कन्नड/खुलताबाद/पैठण/फुलंब्री/सोयगांव/सिल्लोड/वैजापुर /युआरसी-1/युआरसी-2 यांना देवून कळविण्यात येते की, आपल्या तालुक्यातील अधिनस्त असलेल्या शाळांना पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

Scanned by CamScanner